**मे. एमएसआरडीसी लि. यांच्याकडून प्रस्तावित नागपूर-मुंबई एक्सप्रेस वे (पॅकेज-५ मधील भाग) या प्रकल्पासंदर्भांत मौजे वाशाळा, ता. शहापूर, जि. ठाणे येथे पार पडलेल्या पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त.**

मे. एमएसआरडीसी लि. यांच्याकडून प्रस्तावित नागपूर-मुंबई एक्सप्रेस वे (पॅकेज-५ मधील भाग) या प्रकल्पासंदर्भांत पर्यावरणविषयक जाहिर सुनावणी मौजे वाशाळा बुद्रुक, ता. शहापुर, जि. ठाणे येथे दिनांक ०७/१२/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता पार पडली. मप्रनि मंडळाचे कार्यालयीन आदेश क्र. इ-१००/२०१७, संदर्भ पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-४९६२, दिनांक २०/११/२०१७ अन्वये निर्देशित केले गेलेले खालील सदस्य उपस्थित होते.

१) **श्रीमती वंदना सुर्यवंशी,**
निवासी उप-जिल्हाधिकारी, ठाणे
तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, ठाणे — अध्यक्षा

२) **श्री. धनंजय बी. पाटील,,**
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, कल्याण — सदस्य

३) **श्री. सुजीत ढोलम,**
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, कल्याण-३ — समन्वयक

४) **श्री. अमर दुर्गुळे**
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, कल्याण-१ व भिवंडी — समन्वयक

समिती समन्वयक श्री. अमर दुर्गुळे यांनी अध्यक्षा व इतर सदस्य व तसेच उपस्थित नागरिकांचे स्वागत केले. यानंतर पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, २००६ मधील तरतुदींनुसार घेण्यात येणाऱ्या जनसुनावणी बाबत माहिती दिली. सदर जनसुनावणीकरीता अर्ज मप्रनि मंडळास दिनांक १९/९/२०१७ रोजी प्राप्त झाला. यानंतर दिनांक ०७/११/२०१७ रोजीच्या इंग्रजी दैनिक वर्तमान पत्र इंडियन एक्सप्रेस व मराठी दैनिक वर्तमानपत्र सकाळ व लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये जनसुनावणीची जाहिरात देण्यात आली. प्रकल्पाविषयीचे कागदपत्र, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश, संबंधित ग्रामपंचायत कार्यालये व त्याचप्रमाणे इतर सरकारी कार्यालयामध्ये विस्तृत प्रसिध्दीकरीता ठेवण्यात आले होते.

सदर अधिसुचनेनुसार हा प्रकल्प ७ (एफ) या श्रेणीमध्ये मोडतो. सदर पर्यावरणविषयक जनसुनावणीचा उद्देश हा संबंधित नागरिकांमध्ये जनजागृती करुन त्यांचा जनसुनावणीत व विकासाच्या कामामध्ये तसेच पर्यावरण व्यवस्थापन आराखडयामध्ये सहभागी करुन घेणे इत्यादी स्वरुपाचा आहे. उपस्थित नागरिकांनी प्रकल्प प्रर्वतकांचे सादरीकरण झाल्यानंतर प्रकल्पाबाबत सुचना / टिका-टिप्पणी तोंडी तसेच लेखी स्वरुपात द्यावीत अशी विनंती केली. सदर सुचनाबाबत स्पष्टीकरण प्रकल्प प्रर्वतकांमार्फत दिले जाईल व सर्व नागरिकांमार्फत माडल्या गेलेल्या सर्व सुचनांचा इतिवृत्तामध्ये नमुद केल्या जाऊन अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये याचा समावेश केला जाईल. पर्यावरणविषयक अनुमती देण्याबाबत कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार या समितीस नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. जनसुनावणी शांततेत पार पाडण्याची विनंती उपस्थित नागरिकांना समिती समन्वयक यांनी केली.

मे. एमएसआरडीसी लि. यांचे अधिकाऱ्यांनी प्रकल्पाविषयी सादरीकरण केले ज्यामध्ये प्रस्तावित प्रकल्पाचे बांधकाम, पर्यावरण आघात मुल्याकंन आणि पर्यावरण व्यवस्थापन आराखडा याबाबतचे विस्तृत माहिती दिली. श्री. नरेंद्र टोके, पर्यावरण सल्लागार, एमएसआरडीसी लि यांनी माहिती दिली की, भारत सरकारने आतंरराष्ट्रीय दर्जाचे ६ एक्सप्रेस हायवे प्रस्तावित केले असून त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य सरकार मार्फत सद्य:स्थितीतील उपलब्ध महामार्गावरील अवजड वाहतुकीचे फेरफार व पुर्नवितरण करण्याच्या उद्देशाने नागपुर-मुंबई एक्सप्रेस वे नियोजित केलेला आहे. सदर प्रस्तावित महामार्गाचे काम मे. एमएसआरडीसी यांचेमार्फत केले जाणार असुन हा महामार्ग विदर्भ, मराठवाडा व कोकण या प्रादेशिक विभागातील एकूण १० जिल्हयातून जाणार आहे. केंद्र सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयामार्फत प्राप्त टीओरनुसार पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा मसुदा तयार केलेला आहे. सदर प्रस्तावित एक्सप्रेस वे ची गरज आणि राज्यातील एकूण १० जिल्हयातुन हा जाणारा महामार्ग एकूण ६०% भौगोलिक क्षेत्रास सेवादायी ठरेल. हा महामार्ग ५ पॅकेजसमध्ये विभागला गेला आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, २००६ मधील तरतुदींनुसार जिल्हानिहाय पर्यावरणविषयक जनसुनावणी घेणे अपेक्षित आहे. सदर महामार्गावरील दुरध्वनी केंद्र, ५० कि.मी. अंतरावर स्वच्छता केंद्र, महामार्गा लगत वृक्षारोपण, सौरऊर्जेवरील दिव्याचे नियोजन, फुड प्लाझा व उपहारगृहे, निकडीच्या प्रसंगी पुरविण्यात येणाऱ्या सोई-सुविधा इत्यादी बाबत विवेचन करण्यात आले. महामार्गाचे पावसाळी पाणी वाहुन नेणारे गटारांचे नियोजन तसेच रेन वॉटर हार्वेस्टींगकरीता उभारण्यात येणारे बांधकाम याबाबतची माहिती दिली. जिल्हा प्रशासनाच्या मदतीने सद्य:स्थितीत वापरात नसलेले दगड खाणीचे पाण्याचे साठवणुक क्षेत्रात रुपांतर करण्याचा प्रस्ताव एमएसआरडीसी यांनी दिल्याचा सांगितले.

तांत्रिक मुद्दे व अहवाल तयार करण्याकरीता केले गेलेल्या सर्वेक्षणाबाबत विस्तृत माहिती दिली. त्रीस्तरीय वृक्षारोपण महामार्गाच्या दोन्हीबाजुस प्रस्तावित असुन ९२,८२० झाडे प्रकल्पांअंतर्गत लावण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. पर्यावरण व्यवस्थापन अहवालाबाबत विस्तृत विवेचन देण्यात आले. प्रस्तावित वाहनांच्या वर्दळीमुळे होणारे ध्वनीप्रदूषण कमी करण्याकरीता ध्वनी रोधक बसविण्यात येणार असल्याचे सांगितले. प्रकल्पाच्या एकूण खर्चा व्यतिरिक्त रु. ४४.२५ कोटी पर्यावरण व्यवस्थापन अहवालकरीता राखुन ठेवला आल्याचे सांगितले.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर बैठकीच्या अध्यक्षा व समन्वयक यांनी उपस्थित नागरिकांना त्याचे सुचना तसेच टिका-टिप्पणी मांडण्याबाबत संबोधित केले. नागरिकांना त्याचे म्हणणे थोडक्यात सांगण्याबाबत सुचना केल्या. यानंतर उपस्थित नागरीकांनी त्यांच्या सुचना व टिका-टिप्पणी मांडल्या त्या खालील प्रमाणे :

**१) श्री. विनायक पवार, अध्यक्ष, शेतकरी संघ समिती, मुंबई-नागपुर समृध्दी हायवे :**

(१) जनसुनावणीबाबतची जाहिरात वर्तमानापत्रात एक महिना अगोदर प्रकाशित झाली होती. तसेच संबंधित कागदपत्रे ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध झाली होती. मात्र सदर अहवालाचा अभ्यास करण्याकरीता अजुन वेळ आवश्यक आहे.

(२) वन जमिनीमध्ये प्रकल्पाकरीता संपादित क्षेत्र ९० मीटरचे असून इतर ठिकाणी संपादन क्षेत्र १२० मीटर इतके आहे. याचे काय कारण आहे.

(३) रस्त्याची उंची सुमारे ६ मीटर असून नागपुर-मुंबई एक्सप्रेस वे करीता लागणारा कच्चा माल उदा. माती, दगड, खडी इत्यादीबाबत काय तरतुद केलेली आहे.

(४) पाण्याचा योग्य तो निचरा होण्याकरीता काय व्यवस्था केलेली आहे, महामार्गाच्या प्रकल्पामुळे विविध ठिकाणी पाणी जमा होण्याची शक्यता आहे.

(५) झाडांची मोठया प्रमाणावर कापणी होणार आहे व त्याबाबत पुन्हा सर्वेक्षण होणे आवश्यक आहे.

(६) अपघात निर्मुलन / नियंत्रण आराखडा तयार केलेला आहे काय?

(७) पाळीव जनावरांकरीता, वाहने व जंगली जनावरे यांच्याकरीता अंडर पास सुविधा जास्त प्रमाणात आवश्यक आहे, रेन वॉटर हार्वेसिंग करीता काय उपाययोजना केलेली आहे.

(८) प्रकल्पाअंतर्गत नोडचा विकास करण्यात येणार असून त्यामुळे येथील पाणलोट क्षेत्रावर परिणाम होणार आहे. शहापूर तालुक्यातील धरणामधून मुंबई शहराला पाणी पुरवठा केला जातो. प्रकल्पामुळे पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होईल.

(९) इंडियन रोड काँग्रेस यांनी चौपदरी महामार्ग बनविण्याची शिफारस केली असताना सदर एक्सप्रेस वे सहापदरी का बनविण्यात येत आहे, त्याचप्रमाणे आयआरसी यांनी सद्य:स्थितीत जेथे रस्ता उपलब्ध नसेल त्याठिकाणी नवीन महामार्ग बनविण्याची शिफारस केली आहे.

(१०) सामाजिक आरोग्यावर प्रस्तावित प्रकल्पामुळे काय परिणाम होणारे आहेत.

(११) प्रस्तावित प्रकल्पामध्ये जाणाऱ्या जमिनीमध्ये लाखो टन शेतीमाल उत्पादित केला जातो याकरीता पर्यायी व्यवस्था काय असेल.

(१२) सर्विस रोड हे पुर्ण महामार्गाच्या लांबीइतके असावे.

(१३) आयआरसी ने महामार्ग १२० कि.मी./तास वेगाकरीता बनविण्याची शिफारस केली असता सदरचा महामार्ग १५० कि.मी./तास का बनविला जात आहे.

**समिती समन्वयक** यांनी स्पष्टीकरण दिले की, जनसुनावणीबाबत जाहिरात ही वर्तमानपत्रामध्ये एक महिना अगोदर देण्यात आली होती. यामुळे अधिसुचनेतील तरतुदीनुसार ३० दिवसांचा पुरेसा वेळ पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाबाबत अभ्यास करण्याकरीता दिला गेला होता.

२) **श्री. केशव चौधरी, प्राध्यापक, आरकेटी महाविद्यालय, उल्हासनगर, जि. ठाणे :**

(१) पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अपुर्ण व अर्धसत्य असून पर्यावरण मंत्रालयाच्या नियमावलीचा नुसार बनविलेला नाही.

(२) पर्यावरण मंत्रालयाने दिलेल्या टीओआर नुसार अहवाल बनविण्यात आलेला नाही.

(३) सध्या अस्तित्वात असलेल्या वृक्षांचे सर्वेक्षण झालेले नाहीत.

(४) प्रकल्प क्षेत्राचे अक्षांश व रेखांश चुकीचे दर्शविले आहेत.

(५) अहवालातील संरेखन अहवाल हा पर्यावरणीय मापदंडानुसार नाहीत त्याचा अभ्यास केला गेलेला नाही.

(६) सदरचा अहवाल नाबेट मान्यताप्राप्त संस्थेमार्फत बनविण्यात आलेले नाहीत. याबाबतचे प्रमाणपत्र अहवालात जोडलेले नाहीत.

(७) पर्यावरण अनुमती प्राप्त होण्या अगोदर भुसंपादनाची प्रक्रिया का सुरु केली गेली आहे.

(८) वन खात्याची अनुमती न मिळाल्यास प्रकल्प कसा पुर्ण होणार आहे.

(९) महाराष्ट्र सरकारने भुसंपादनाबाबत पर्यावरण मंत्रालयाचे अटी शर्तीचे पालन केलेले नाही.

(१०) प्रकल्प अहवालाचा कार्यकारी सारांश अत्यंत तोकडा आहे.

(११) पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल मराठीत बनविणे आवश्यक आहे.

(१२) अहवालामध्ये टोपोशीट जोडलेली नाही. टोपोशीट मध्ये सीमा निश्चीती करणे आवश्यक आहे.

(१३) बायो डायव्हर्सीटी बाबत सर्वेक्षण केल्याची माहिती आढळून येत नाही.

(१४) झाडांच्या देखभालीकरीता प्रस्तावित केलेला खर्च हा अव्यवहार्य केलेला वाटत आहे.

(१५) अहवालामध्ये ९२८२० झाडे ही संख्या कोणत्या आधारावर प्रस्तावित केलेली आहे.

(१६) अस्तित्वात असलेल्या झाडांची कार्बन शोषण क्षमता याचा अभ्यास केला गेला आहे का, खुप मोठया प्रमाणावर वृक्ष तोड होणार आहे.

(१७) वन खात्याची अनुमती अहवालात जोडलेली नाही.

(१८) अस्तित्वात असलेल्या वृक्षांचे सर्वेक्षण करुन याबाबतचा अहवाल असणे आवश्यक आहे.

(१९) महामार्गाचे निश्चित झालेले संरेखन अधिक खर्चाचे असून यामध्ये जनतेच्या पैशांचा अपव्यवय होणार आहे. या महामार्गास पर्यायी मार्ग दादर-मुंबई येथुन चालु होतो व तेथुन मध्यप्रदेशातील देवरीपर्यंत जातो. समुध्दी महामार्ग हा मुंबई शहराच्या केंद्रस्थानी जात नाही.

(२०) महामार्गाचे पॅकेज ५ आमने गावापर्यंत संपत असुन तेथील वाहतुकीचे नियोजन काय केलेले आहे.

(२१) प्रकल्प अहवालामध्ये कायदेशीर व पर्यावरणविष्यक त्रुटी आहेत.

(२२) प्रस्तावित महामार्ग इको सेनसिटीव क्षेत्रातुन जात आहे.

(२३) हवा प्रदूषण, ध्वनी प्रदूषण इत्यादी मुद्दयाबाबत आघात मुल्यांकन आवश्यक असून, त्याचप्रमाणे प्रकाशामुळे वन्य जनावरे व पक्षी यांच्यावर होणाऱ्या आघाताचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

(२४) लुप्तप्राय प्रजाती तसेच वन्यजीव यांच्या हालचालीवर काय परिणाम होणार आहे.

(२५) भुसंपादनाची प्रक्रिया ही सीआरपीसी सेक्शन १४४ नुसार केली गेलेली नाही.

(२६) शेतकऱ्यांच्या जमिनी पर्यावरण अनुमती मिळाल्यानंतर संपादित केल्या गेल्या पाहिजेत.

(२७) भुसंपादनाची प्रक्रिया पर्यावरण अनुमती मिळाल्यानंतर केली जाणे आवश्यक आहे.

(२८) पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अपुर्ण असताना का स्विकारला गेला आहे.

(२९) प्रस्तावित महामार्ग इको सेनसेटीव क्षेत्रातून जात असून परिवर्तीत प्रकाश त्याचा पक्षांवर आघाताचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

३) **श्री. अरुणदेव खंबाळकर, लाहे गाव रहिवाशी :**

(१) लाहे गाव येथे प्रस्तावित नागपुर-मुंबई एक्सप्रेस वे रहिवासापासून सुमारे २००-३०० मीटर अंतरावर जाणारा असून यामुळे ध्वनी प्रदूषणाची समस्या निर्माण होणार आहे.

(२) बीपीसीएल यांची पाईपलाईन त्याच्या शेतापासून २००-३०० मीटर अंतरावर जाते सदर पाईपलाईन रस्त्याच्या आरेखनामध्ये येते का?

(३) प्रस्तावित प्रकल्पाकरीता बोगदे व टेकडया तोडण्यात येणार आहेत त्यामुळे वन क्षेत्रांवर आघात होऊन जल तसेच हवा प्रदूषणाची समस्या निर्माण होईल.

(४) प्रकल्पामधील महामार्गालगत विकसित होणाऱ्या उद्योगातून पर्यावरणाचा ऱ्हास होईल व प्रदूषणाच्या समस्या निर्माण होईल.

(५) इको सेन्सेटीव क्षेत्रामधील महामार्गाचे रेखांकन मार्ग बदल करण्यात यावे.

(६) मोठया प्रमाणात वृक्ष तोड करण्यात येईल.

(७) हा परिसर भुकंप प्रवण क्षेत्रामध्ये आहे.

४) **श्रीमती ध्वनीशा, प्रतिनिधी, कन्झ्रवेशन ॲक्शन ट्रस्ट, मुंबई :**

(१) पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल ७८ कि.मी. करीता बनविण्यात आला आहे. संपुर्ण प्रकल्पाकरीता एकच अहवाल बनविणे आवश्यक होते.

(२) अहवाल मप्रनि मंडळाच्या संकेतस्थळावर उपलबध नाही.

(३) पर्यावरण आघात मुल्यांकन सर्वेक्षण केवळ एका ऋतुकरीता केलेले आहेत.

(४) वन्यजीव विभागाने दिलेल्या शिफारशी संकेत स्थळावर उपलब्ध आहे आवश्यक आहे.

(५) प्रकल्पाची उभारणी करत असताना पर्यावरणाची वाहक क्षमता अभ्यास करणे आवश्यक आहे.

(६) फ्लोरा व फोना यांचे प्रजातीचे अनुसुची देणे आवश्यक आहे.

(७) वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ मधील तरतुदींचे अनुपालन.

(८) आययुसीएम मधील लुप्तप्राय प्रजातीची सुची अहवालामध्ये दिलेली नाही.

(९) सदर प्रकल्पाचे पाच वेगळे पर्यावरणविषयक अनुमती प्राप्त करणे नियमबाहय आहे.

(१०) संपुर्ण ७०१ कि.मी. लांबीचा रस्ता एकत्रितरित्या अभ्यास करुन अहवाल बनविणे आवश्यक आहे.

(११) प्रकल्पाअंतर्गत करण्यात येणाऱ्या वनीकरणाबाबत झाडांच्या प्रजातीची सुची अहवालामध्ये दिलेली नाही.

(१२) पर्यावरण आघात मुल्यांकन सर्वेक्षण करताना सुक्ष्मजीवशास्त्राचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

(१३) प्रकल्पाव्यतिरिक्त इतर विकासाच्या कामामुळे होणाऱ्या आघाताचा व परिणामांचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

५) **श्री. कपील धामणे, गाव चिराडपाडा, ता. भिवंडी, जि. ठाणे:**

(१) प्रस्तावित महामार्ग पिसे गावांतील धरणापासून १५०-२०० मीटर अंतरावरुन जात आहे. तेथे सूमारे ४०० मीटर अंतरावर पाण्यावरील पुल प्रस्तावित आहे.

(२) धरणावरती ५.५ मीटर उंचीचे एमबार्कमेंट प्रस्तावित आहे का?

(३) पावसाच्या पाण्याचे निचरा होण्याकरीता नियोजन काय आहे?

(४) पुलाचे नियोजन केले आहे काय?

(५) जनसुनावणीबाबतची कागदपत्र ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध होती मात्र जिल्हा परिषद निवडणुकामुळे कागदपत्रांचा अभ्यास करण्यास पुरेसा वेळ मिळालेला नाही.

६) **श्री. तुकाराम दत्तात्रय सरपोतदळखर**

(१) निवासी क्षेत्रातील महामार्गापासूनचे अंतर किती असावे याबाबत काय नियमावली आहे.

(२) प्रस्तावित एक्सप्रेस वे मुळे प्रदूषणाच्या समस्या उद्भवणार आहेत.

(३) प्रस्तावित महामार्गालगत स्मार्ट सिटीचे काय नियोजन असणार आहे.

(४)प्रस्तावित प्रकल्पाकरीता जमिन एमएसआरडीसी यांना दिलेली असून गेलेल्या जमिनी इतके क्षेत्र शासनाकडून प्रकल्प ग्रस्तांना दिले गेले पाहिजे.

**श्री. नवले सुप्रिटेंड इंजिनियर, एम.एस.आर.डी.सी.** यांनी सांगितले की प्रस्तावित महामार्ग प्रकल्पामध्ये वन जमिनीमध्ये सर्विस रस्ता असणार नाही मात्र बिगर वने क्षेत्रामध्ये सर्विस रस्ता प्रस्तावित केलेला आहे. आय आर सी यांनी 120 किमी /तास मानक आखून दिले आहे मात्र भविष्यकाळाची गरज लक्षात घेता प्रस्तावित महामार्गाचा डिझाईन स्पिड 150 किमी/तास असेल. सदर महामार्गामध्ये 365 मीटर कमीतकमी दृश्यमानता अंतर सर्व ठिकाणी राखले जाईल. महामार्गाच्या बांधकामाकरता लागणारी माती, जेथे खोदकाम होईल तेथून उपलब्ध करुन दिली जाईल. बोगदयाच्या कामातून खुप मोठया प्रमाणात दगड उपलब्ध होणार आहे. महामार्गाचे नियोजन पुढील वीस वर्षाचा कालावधी लक्षात घेता सहा पदरी रस्ता प्रस्तावित केलेला आहे. मे. बीपीसीएल यांचे सुमारे 4.8 किमी लांबीची पाईप लाईन जागा बदल करायची असून त्याबाबत शासन स्तरावर बैठक झालेली आहे व ती प्रक्रिया सुरु आहे. महामार्गाच्या दोन्ही बाजूस पुरेशा प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. भविष्यामध्ये नागपूर ते मुंबई दरम्यान मालवाहतूकिचा वेग अधिक वाढवण्याकरीता समृध्दी महामार्गाची गरज आहे. वन जमिनीमध्ये सर्विस रस्ता प्रस्तावित नसल्याने तेथे महामार्गाची रुंदी कमी असणार आहे.

श्री. नरेंद्र टोके, पर्यावरण सल्लागार एम.एस.आर.डी.सी यांनी सांगितले की महामार्गाच्या बांधकामाकरीता लागणाऱ्या कच्या मालाचा नियोजन आराखडा तयार असून या बाबत तपशील अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमुद करण्यात येतील. सादरिकरणादरम्यान प्रस्तावित प्रकल्पातील पावसाळी पाण्याचा निचरा होण्याकरता क्रॉस ड्रेनेज बांधकाम तसेच पाण्याचे चॅनल या संबंधी विस्तृत माहिती दिलेली आहे. प्रस्तावित

महामार्ग नैसर्गिक पाण्याच स्त्रोत्र पार करुन जाणार असल्याने, प्रकल्पांतर्गत एक मोठा पूल, तीन छोटे पूल, 29 क्रॉस डेनेज आणि 46 विओपी, वियुपी, एलवियुपी, पीयुपी, एयुपी प्रस्तावित केलेले आहे. व्यतिरिक्त प्रत्येक 500 मीटर अंतरावर महामार्गाच्या दोन्ही बाजूस रेन वॉटर हारवेस्टींग बाधकामे प्रस्तावित केलेली आहे.

पाण्याच्या उपलब्धते करीता धरणे, पूल तथा बंधारा तसेच इतर पाणी साठवणूक उपाय योजना यांचे बांधकाम करण्याकरता एम.एस.आर.डी.सी यांनी जीएसडीए विभागास कळविले आहे.

पर्यावरण मंत्रालयाच्या एसईएसी समितीने एम.एस.आर.डी.सी. यांना वापरात नसलेल्या दगड खाणीचा वापर पाण्याच्या साठवणुकिकरता करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. या साठवलेल्या पाण्याचा वापर प्रकल्पाच्या बांधकामाकरीता करायचा असून प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर सदर तळी जिल्हाप्रशासनास हस्तांतरीत केले जाईल.

महामार्गाच्या सरेंखना दरम्यान कॅटल अंडरपास तसेच वन्यजीव अंडरपास याबाबतचे नियोजन वन विभागाच्या सल्यानुसार करण्यात आलेले आहे.

श्री. नरेंद्र टोके यांनी स्पष्ट केले की महामार्गालगत विकसित करण्यात येणारे नोड/स्मार्टसिटी इत्यादी प्रकल्प वेगळया स्वरुपात मांडले जातील. ते या प्रकल्पाचा भाग नाही. त्याकरता वेगळा पर्यावरण आघात मुल्यांकंन अभ्यास केला जाईल, ज्यामध्ये प्रभवित क्षेत्रातील संभवित जल प्रदुषणाचा अभ्यास केला जाईल.

श्री. विनायक पवार यांनी मातीचे नियोजनाबाबत प्रश्न उपस्थित केला.

याबाबत असे स्पष्टिकरण देण्यात आले की, एकूण दहा माती उत्खनन क्षेत्र व तेरा दगड खडी मशीन नियोजीत केले आहेत. त्याचप्रमाणे पाण्याच्या स्त्रोताबात राज्यसरकारच्या परवानगीने नियोजन करण्यात येणार आहे. पर्यावरण आघात मुल्यांकंन अहवाल QCI व NABET मान्यता प्राप्त संस्थेमार्फत बनविण्यात आलेला आहे.

भुतकाळातील रस्ते व ट्रॉफिक यांचा आलेला अनुभव व भविष्य काळाची गरज लक्षात घेता प्रस्तावित प्रकल्प सहा पदरी बनविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सार्वजनिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामाबाबत सामाजिक आर्थिक सर्वेक्षणामध्ये अंतरभूत केलाअसून याबाबतचे विवेचन सादरीकरणादरम्यान करण्यात आलेले होते. श्री. नरेंद्र टोके यांनी स्पष्ट केले की पर्यावरण आघात मुल्यांकंन अहवालाचा मसुदा, ऐक्सपर्ट ॲप्रेजल कमिटी यांनी दिनांक २०/०३/२०१७ रोजी दिलेल्या टीओआर नुसार तयार करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे वने व पर्यावरण मत्रालयाच्या नियमावली नुसार NABAT मान्यता प्राप्त सल्लागार संस्था मे. बिल्डींग ऐन्वायरमेंट इंडिया प्रा. लि., नवी मुंबई यांचे मार्फत बनविण्यात आलेला आहे. सदरचा अहवाल मंडळाच्या संकेत स्थळावर जनतेच्या अभ्यासाकरता उपलब्ध होता. जनसुनावणी दरम्यान मांडण्यात आलेल्या सुचना व टिका टिपणी यांचा विचार करता मसुदयामध्ये योग्य ते बदल करण्यात येतील व त्यानुसार अंतिम अहवाल तयार करण्यात येतील.

प्रकल्प प्रवर्तकातर्फे स्प्ष्ट करण्यात आले की पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ मधीन तरतुदीनुसार घ्यावयाची पर्यापरण विषयक अनुमती व वने सवर्धन कायदा १९८० मधील तरतुदीनुसार घ्यावयाची वने विषयक

अनुमती, या दोन वेगळया परवानग्या आहेत. या दोन्ही परवानग्या केंद्र सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयामार्फत दिल्या जातात व त्या मिळविण्याकरता वेगळया प्रक्रिया आहेत. पर्यावरण आघात मुल्याकंनामध्ये प्राथमिक तसेच व्दितीय स्वरुपाची सर्व माहिती अंतरभूत केलेली आहे.

पर्यावरण विषयक अनुमती मिळाल्या शिवाय प्रकल्पाचे काम सुरु करण्यात येणार नसल्याचे स्पष्टीकरण प्रकल्प प्रवर्तकांनी दिले. सादरीकरणामध्ये महामार्गालगत ध्वनी रोधक यंत्रणा बसविण्यात येणार असल्याचे व त्यबाबत माहिती दिल्याचे सांगितले.

श्री. नवले **सुप्रिटेंड इंजिनियर, एम.एस.आर.डी.सी. यांनी सांगितले की मे.** बिपीसीएल यांची पाईपलाईन जागा बदल करताना तांत्रिक व शास्त्रिय मुददयाचा विचार करुन तसेच सुरक्षेच्या दृष्टीकोनातून करण्यात येईल.

श्री. नरेंद्र टोके यांनी माहिती दिली की नागपूर मुंबई महामार्गालगत नोड विकास प्रकल्पाबाबत प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू असून तो स्वतंत्र प्रकल्प आहे. जनसुनावणी दरम्यान मांडल्या गेलेल्या सर्व सुचना टिका टिपणी या स्वीकृत केल्या जातील व त्याबाबत सारासार विचार करुन अंतिम पर्यावरण आघत मुल्याकंन अहवाल तयार केला जाईल.

या नंतर श्री. अमर दुर्गुळे, समन्वयक यांनी पुन्हा ऐकदा काही सुचना असल्यास मांडण्याची विनंती केली व उपस्थित केल्या गेलेल्या सर्व हरकती व सुचना इतिवृत्तामध्ये नमुद करुन वने व पर्यावरण मंत्रालयास कळविणार असल्याचे सांगितले.

यानंतर जनसुनावणी अध्यक्षा यांनी उपस्थित नागरीकांचे सक्रिय सहभगा करीता आभार मानले व जनसुनावणी संपल्याचे जाहिर केले.

**(श्री. धनंजय पाटील)**
**सदस्य**

**(श्रीमती. वंदना सुर्यवंशी)**
**अध्यक्षा**

**(श्री. सुजीत ढोलम)**
**समन्वयक**

**(श्री. अमर दुर्गुळे)**
**समन्वयक**